# अर्थ-उद्योग



वर्ष-९-अंक-१-२-२००४

## उद्योजकतेचा सिध्दांत आणि व्यवस्थापन विशेषांक



## वैद्यकीय क्षेत्रातील प्रतिभेसह

# या अंकात


## संपादकीय

✎ भूमिका स्पष्ट करणारे अंत: करणाचे ध्वनी

## अर्थ - उद्योग स्पेशल

✎ आपणही असे व्यवस्थापक आहात काय ?

✎ सुयोजितमुळे नाशिकला सौंदर्याचा चेहरा

✎ उद्योजकतेमधील ऐतिहासिक प्रकरण - रिलायबल उद्योग समुह

✎ विकासाला पुरक व्यवसाय म्हणजे यशाची शाश्वती - बेबीलाल संचेती

✎ व्यवसायातील एक अपवादात्मक अनुभव

✎ आव्हानात्मक मार्ग यशाकडे नेणारा - शहाबुद्दीन शेख

## कव्हरस्टोरी

✎ 'सतत उत्कृष्टता आणि गुणवत्तेचा ध्यास हवा' - के. एल. खन्ना

✎ आजचे काम उद्यावर टाकू नये - अशोक कटारिया

✎ ''उद्योगातून निवृत्त होणे शक्य नाही'' - राधाकिसन चांडक

✎ नम्रता ही माणसाच्या चांगुलपणाची खूण - भवरलाल जैन

✎ उद्योजक म्हणजे शालीन, सोज्जवळ, अभ्यासू आणि पारदर्शकतेचे रूप - खुशालभाई पोद्दार

✎ भारतात लवकरच दरवर्षी सहा ते सात लाख गाड्यांची गरज - विल्सन डिसोझा

✎ आपली माणसे हीच खरी संपत्ती - विजय वासन

✎ योजना कृतीत आणणे म्हणजे बुद्धिमत्ता - बाबुराव सोनार

✎ 'उद्योजकता आणि समाजकार्य एकाच नाण्याच्या दोन बाजू' - योगेश कणानी

✎ यशाचा पाठपुरावा गरजेचा - अकिलकुमार अग्रवाल

✎ जिव्हाळ्याचा व्यवहार म्हणजे यशस्वी व्यवस्थापन - गणेश पै

✎ उद्योगसमुहांतर्गत उद्योजकता विकास अशोकायुपमधील यशस्वी कल्पना - सतिश पारख

✎ स्पर्धेत टिकावासाठी तयारी, सराव आणि कठोर परिश्रमांना पर्याय नाही - विनिता धारकर

✎ निर्मिती म्हणजे कौशल्य आणि कामगिरीचा अभिमान -सुरज शहा

✎ उद्योगात नितिमूल्यांना सर्वाधिक महत्व - शशिकांत शेट्टी

✎ ग्राहकाशी चांगले संबंध म्हणजे सोन्यासाठी खोदकाम - बालाजी माने

✎ उद्योग निवडताना दुरदृष्टी महत्वाची - झुंबरलाल भंडारी

✎ प्रयत्न आणि संघर्षाशिवाय उत्तम निर्मिती नाही - वर्मा ग्रुप ऑफ कंपनीजचा स्वानुभव

✎ उत्कृष्ट कामासाठी प्रयत्न न करणे हा गुन्हा - जगजितसिंग मारवाह

✎ वैभवशाली भविष्यकाळावर माझा हक्क - संजीव बाफणा

✎ चिकाटीच्या बळावर विकासाचा टप्पा आवाक्यात - पलोड बंधुंचा विश्वास

✎ उद्योगातील यश म्हणजे चिकाटीचं फलित - आर. एस. भाटिया

✎ यशस्वी होण्याचा आशावाद सर्वाधिक मोलाचा - मिनाताई चौधरी

✎ सहज मिळालेले यश निरर्थक - संजय कोकणे

✎ धैर्य आणि चारित्र्यं म्हणजे उत्तम यश - विलास जाधव

✎ उत्कृष्ट कामगिरी फक्त निष्ठेनेच शक्य - गंगाधर बुरकुले

✎ कर्तव्यासाठी झपाटलेला म्हणजे विजेत्याचे जीवन - डॉ. शरद पाटील

✎ वैद्यकीय व्यवसाय म्हणजे सर्वोत्कृष्ट सेवेचे समाधान - डॉ. विजय काकतकर

✎ व्यावसायिक यश म्हणजे एकाग्रतेचं बळ - डॉ. प्रदीप पवार

✎ यशाच्या मांडणीपेक्षा ध्येय महत्वाचे - डॉ. अनिरूद्ध धर्माधिकारी

✎ बायपास शस्त्रक्रियांमधील यशस्वी नाव - डॉ. अभयसिंग वालिया

✎ आत्मविश्वास म्हणजे कौशल्याची सिद्धता - डॉ. कुणाल गुप्ते

✎ यशासाठी भरवशाचा अशी माणसाची ओळख असावी - डॉ. नारायण विंचुरकर

✎ डॉ. लेलेंमुळे आरोग्य क्षेत्रात नाशिकचा गौरव

✎ खऱ्या ध्येयाची मुळे सर्वोत्कृष्ट बनण्याच्या इच्छेत - डॉ. चंद्रवदन जिरे

✎ विचारांचा सरळपणा आणि जबरदस्त इच्छाशक्ती म्हणजे कार्यपूर्ती - वैद्य विक्रांत जाधव

✎ अभ्यास आणि आत्मविश्वासामुळे यश निश्चित - डॉ. रमाकांत पाटील

✎ उत्तम कामाचे पारितोषीक म्हणजे ते काम पूर्ण झाले हेच होय - डॉ. विनायक नेर्लिकर

ज्यांना फक्त उद्योगासाठी जन्मलेली व्यक्ती असेच म्हणता येईल आणि सृजनशिलतेचेही माहेरघर असा उल्लेख करावा लागेल असे उद्योगपती म्हणजे जळगांवचे भवरलाल जैन ! जैन उद्योग समुहाचे प्रवर्तक. धरती नटविणारा, मातीतून सोनं उगवणारा, शेतकऱ्यांमध्ये प्रेरणा निर्माण करणारा, महान उद्योगपती. ज्यांच्या कार्यापुढे आकाशालाही ठेंगणं व्हावसं वाटतं आणि भूमीपुत्राची मान ताठ होऊन जाते. शेतकऱ्यांनो समृद्ध व्हा हा संदेश श्री जैन यांच्या उद्योजकीय कृतीने दिला आणि भारतीय माणसाची नाळ, औद्योगिकरणातले कोणतेही संक्रमण घडले तरी, कृषीशीच घट्ट झाली. श्री जैन यांचे उद्योजकीय कर्तृत्व याची देही याची डोळा अनुभवावे असे आहे.

नम्रता ही माणसाच्या चांगुलपणाची खूण आहे. नम्रतेचंच दुसरं नाव सौजन्य आहे. असं वागण्यासाठी खर्च फार येत नाही, पण त्याचे फायदे खूप असतात. एखाद्या व्यक्तीच्या सभ्य व विनम्र वर्तनाचे फायदे केवळ त्या व्यक्तीलाच नव्हे तर त्या व्यक्तीशी संबंधित संस्थेलाही मिळतात. भवरलाल जैन यांनी हे सिद्ध केले.




भवरलाल जैन

# नम्रता ही माणसाच्या चांगुलपणाची खूण

# - भवरलाल जैन

**मा**णसाने नेहमी माणसातच गुंतवणूक केली तर काहीही कमी पडत नाही. तसेच भरपूर परिश्रम करावेत. स्वतः समाधान मिळविण्याइतके. तसेच चॉईस तुमचाच असावा. क्वान्टिटीपेक्षा क्वालिटी महत्वाची मानावी. पैशाचा विचार कधी करू नये. आपण कोणीतरी आहोत असे गृहित धरू नये. या बाबींचा आपल्या जीवनात समन्वय साधून चांगले करून दाखविण्याची स्वप्ने अवश्य पाहावीत. म्हणजे कर्तृत्व वास्तवात साकार होते: असे श्री जैन यांचे तत्वज्ञान आहे.

निसर्गातील बहुमूल्य साधनस्त्रोतांचा विविध पर्यायांद्वारे वापर किंवा त्यांचेच मोल वाढवून केलेल्या पृथक प्रयत्नांचा परिपाक म्हणजेच जळगाव स्थित ...००० दशलक्ष रुपयांची उलाढाल असणाऱ्या जैन उद्योग समुहाचे प्रत्येक उत्पादन. हा केवळ योगायोग नव्हे तर निसर्गाच्या जपणुकीविषयी वाटणाऱ्या आत्मियतेतून साकार केलेल्या प्रयत्नांचे फलित आहे. हा विश्वास उद्योगाच्या आघाडीवरच्या दोन कंपन्यांच्या कामात आणि विस्तारामध्ये प्रतिबिंबित होतो. जैन प्लास्टिक्स अँड केमिकल्स लि. आणि जैन इरिगेशन सिस्टिम्स लि. ह्या त्या कंपन्या. जैन प्लॅस्टिक्स अँड केमिकल्स लि. ही कंपनी शुद्ध पपेन, कांदा व पालेभाज्यांचे निर्जलीकरण, फळे व पालेभाज्यांवर प्रक्रिया आणि इरीगेशन पाईप्सच्या व्यवसायात आहे. आणि जैन इरिगेशन ही कंपनी ठिबक सिंचन, तुषार सिंचन, उती संवर्धन, हरित गृहे, विद्राव्य खते, सौरबंब, आणि प्लास्टिक उत्पादनांच्या व्यवसायात आहे. उद्योग समुहाची स्वतःची काही वैशिष्ट्ये आहेत. सर्वाधिक शुद्ध पपेनचे एकमेव उत्पादक, भारतातील पीव्हीसी पाईप्सचे सर्वात मोठे उत्पादक, भारतातील ठिबक सिंचन पद्धतीचे प्रणेते, एका छताखाली विविध प्लॅस्टिक शीट बनविणारे एकमेव उत्पादक आणि पपेन व शीट विभागास जर्मनीकडून प्रशस्तीपत्रक मिळविणारा उद्योगसमुह. श्री जैन यांच्या उद्योग समुहाला नुकतीच आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी भेट दिली. आणि प्रत्यक्ष कार्य पाहुन भारावून गेले. श्री जैन यांनी आंध्रप्रदेशातही असे प्रयोग करावेत असे त्यांनी यावेळी सुचवले आणि आंध्रप्रदेशात येण्याचे निमंत्रण देऊन सर्व सोयी सुविधा उपलब्ध करण्याची हमी दिली.



जैन उद्योग समुहाचे भारवाहक - मध्यभागी उभे असलेले श्री. भवरलालजी जैन (अध्यक्ष, जैन उद्योग समुह), उजवीकडून उभे असलेले, समुहाचे उपाध्यक्ष अशोक जैन, संचालक अजित जैन, अनिल जैन व अतुल जैन

Engineers, designers & Manufacturers of
SHEET - METAL MACHINERY
1) Shearing Machine : 1250 mm to 3000 mm Length / 3 mm Thicknss 2) Press Brakes : 1250 mm to 3000 mm Length / 1.5 mm to 6 mm thickness 3) Hand Opp. Press - Brakes : Upto 2500 mm length / 3 mm Thickness 4) Plate, Bending Roller : 150 mm to 3000 mm Length / 3 mm to 40 mm Thickness 5) Steel Body Power Presses : Upto 200 mm Thickness
-: Office & Factory :-
NIRMAL MACHINE TOOLS
F - 68, M.I.D.C., Ambad, Nashik - 422 010.
Phone : 383168.